गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक १७ वा ● सोमवार ०३ जून २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/–

| * Volume 2 | Issue 17 | Date : 03/06/2024 blow Monday Page 4 Price 4

# मान्सून कर्नाटकात दाखल!

## महाराष्ट्रात या दिवशी दाखल होणार, मुसळधार पावसामुळे बंगळुरूसह केरळमध्ये पूर परिस्थिती

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

केरळमध्ये दाखल झालेला मान्सून तामिळनाडूमधून पुढे सरकरला असून आता कर्नाटकात धडकला आहे. नैऋत्य मान्सूनच्या हजेरीमुळे कर्नाटकची राजधानी बंगळुरूला जोरदार पावसाचा इशारा दिला आहे. आय.एम.डी.चया अंदाजानुसार, साधारणपणे ढगाळ आकाश, पाऊस आणि ढगांच्या गडगडाटासह पावसाची शक्यता आहे. पुढील दोन दिवस या भागात जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.




हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार, दक्षिण भारतात ५ जून ते ७ जून २०२४ या दरम्यान मुसळधार पावसाची शक्यता आहे. याशिवाय काही भागात मेघगर्जनेसह सोसाट्याचा वारा वाहण्याचाही अंदाज आहे. तसेच, २ आणि ३ जून २०२४ रोजी कर्नाटकात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. दुसरीकड मुंबईसह महाराष्ट्राच मान्सूनची प्रतिक्षा आहे. महाराष्ट्रात पुढील आठवड्यात मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे. तर, ३ आणि ४ जून २०२४ रोजी मुंबई, ठाणे जिल्ह्यांसह महाराष्ट्रात इतर काही भागात मान्सून पूर्व पावसाची शक्यता वर्तवली जात आहे.

बंगळुरूसह केरळमध्ये पूर परिस्थिती आय.एम.डी.चया अंदाजानुसार, ७ जून २०२४ पर्यंत दिल्लीमध्ये आकाश निरभ्र राहील आणि कमाल तापमान ४४ अंश सेल्सिअस आणि किमान २९ अंश सेल्सिअस दरम्यान राहील. एकीकडे दक्षिणेकडे मान्सून पोहोचला असताना, आय.एम.डी.ने दिल्लीसह उत्तर भारतात उष्णतेच्या तीव्र लाटेचा इशारा दिला आहे. दिल्लीवासीयांना जून महिन्याच्या अखेरपर्यंत उन्हाळ्याच्या उष्णतेपासून कोणताही दिलासा मिळणार नाही, असं आय.एम.डी.ने सांगितलं आहे.

# श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचे पदस्पर्शदर्शन सुरू

## आषाढी नियोजनाची कामे वेळेत पूर्ण करण्याच्या प्रशासनास सुचना

## तळघरात मिळालेल्या मुर्ती संग्रालयात जतन करणार : सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर.





**पंढरपूर/प्रतिनिधी:**


गर्भगृहातील संवर्धनाचे काम आषाढी यात्रा २०२४ पूर्वी पूर्ण करण्याचे असल्याने दि.१५/०३/२०२४ पासून कामास सुरुवात करण्यात आली आहे. तेंव्हापासून पदस्पर्श दर्शन बंद करुन पहाटे ५.०० ते सकाळी १०.४५ वाजेपर्यंत मुखदर्शन सुरु ठेवण्यात आले होते. तथापि, सदर काम पूर्णत्वास आल्याने भाविकांसाठी आज दि.०२/०६/२०२४ पासून श्रींचे पदस्पर्शदर्शन सुरू करण्यात आले आहे. तसेच मंदिर समितीच्या वतीने श्रींची पहाटे ४.०० वाजता नित्यपुजा संपन्न झाली. या पुजेस मा.ना.श्री.चंद्रकांत दादा पाटील, पालकमंत्री महोदय सोलापूर जिल्हा, मा.आ.श्री.बबनदादा शिंदे, मा.आ.श्री.समाधान दादा आवताडे मा.आ.श्री.प्रशांत मालक परिचारक, मंदिर समितीचे सह अध्यक्ष श्री.गहिनीनाथ महाराज औसेकर, मंदिर समितीचे सदस्य, सल्लागार परिषदेचे सदस्य, वारकरी संघटनेचे प्रतिनिधी तसेच पत्रकार उपस्थित होते. श्रींची नित्यपुजा झाल्यानंतर पदस्पर्शदर्शनरांगेतील श्री बालाजी मनोहर मुंडे व सरस्वती बालाजी मुंडे, रा. मनुर जि. अधीलाबाद ह्या प्रथम भाविकांना श्रींचे पदस्पर्शदर्शन घडवून पदस्पर्शदर्शनाची सुरवात करण्यात आली.

तद्नंतर आषाढी यात्रा २०२४ नियोजनाबाबत सह अध्यक्ष यांच्या दालनात सकाळी ९.३० वाजता सह अध्यक्ष श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा संपन्न झाली. या सभेत आषाढी यात्रेत भाविकांना देण्यात येणा–या सोई सुविधांचा आढावा घेण्यात आला. त्यामध्ये दर्शनरांगेचे व्यवस्थापन चांगल्या पध्दतीने करून संबंधित सर्व कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सुचना सह अध्यक्ष यांनी प्रशासनास दिल्या. तसेच मंदिरातील संवर्धन काम करतेवेळी हनुमान गेट येथे मिळालेल्या तळघरातील मुर्ती संग्रालयात जतन करून ठेवणे व तळघराच्या ठिकाणी माहितीची कोणशीला बसवण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच दर्शनरांगेतील कायमस्वरूपी पत्राशेडची दुरूस्ती करून नव्याने २ कायमस्वरूपी पत्राशेड उभारण्याचे ठरले. या सभेस सदस्या शकुंतला नडगिरे, डॉ.दिनेशकुमार कदम, संभाजी शिंदे, भास्करगिरी गुरू किसनगिरी बाबा, ड.माधवी निगडे, ह.भ.प.ज्ञानेश्र्वर देशमुख जळगांवकर, ह.भ.प.श्री.प्रकाश जवंजाळ, ह.भ.प.शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके व व्यवस्थापक बालाजी पुदलवाड उपस्थित होते.

## अजितदादांच्या राष्ट्रवादीने सीमेपार झेंडे रोवले, निवडणुकीत तीन उमेदवार विजयी

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

लोकसभा निवडणूक संपल्यानंतर जाहीर झालेल्या एक्झिट पोल्समध्ये महाराष्ट्रात अजित पवार यांच्या नेतृत्त्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसला फारशी चमकदार कामगिरी करता आलेली नाही. या निवडणुकीत अजितदादा गटाचे (–क्षळीं झुरी उरा) चार उमेदवार रिंगणात होते. तर राष्ट्रवादीच्या वाट्याची परभणीची पाचवी जागा अजित पवारांनी महादेव जानकर यांच्यासाठी सोडली होती. मात्र, अजित पवार यांनी लढवलेल्या एकाही जागेवर उमेदवार निवडून येतो की, नाही याबाबत साशंकताच आहे. एक्झिट पोलनुसार, अजित पवार गटाची फारफार तर एक जागा निवडून येऊ शकते. ही जागा कोणती असेल, हे स्पष्ट नाही. ही सगळी परिस्थिती पाहता अजितदादा गटाची राज्यातील कामगिरी यथातथाच म्हणावी लागेल. मात्र, या सगळ्या निराशाजनक परिस्थितीत अरुणाचल प्रदेशातून अजितदादांसाठी आनंदाची बातमी आली आहे.



विधानसभेची मुदत संपत असल्याने अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीम विधानसभा निवडणुकीची मतमोजणी रविवारीच पार पडली. अरुणाचल प्रदेशात विधानसभेच्या एकूण ६० जागा आहेत. यामध्ये भाजपने तब्बल ४१ जागा जिंकत घवघवीत यश मिळवले. अन्य पाच जागांवर भाजपचे उमेदवार आघाडीवर असल्याने विजयी जागांचा हा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे.

अरुणाचल प्रदेशच्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे एकूण १५ उमेदवार उभे होते. यापैकी तीन जण निवडून आले आहेत. तर एक उमेदवार दोन मतांनी पडला आहे. दुसरा उमेदवार २०० मतांनी पडला आहे. अरुणाचल प्रदेश विधानसभेत भाजप सर्वात मोठा पक्ष. ४६ आमदार जिंकत भाजपने विधानसभेतील आपली सत्ता राखली. राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकारी अध्यक्ष प्रुफल पटेल यांनी अरुणाचल प्रदेशातील विजयाबद्दल अभिनंदन केले आहे. अरुणाचल प्रदेश विधानसभेत राष्ट्रवादी काँग्रेसने तीन जागा जिंकल्या असून पक्षाला एकूण १० टक्के मतं पडली आहेत. राष्ट्रीय पक्ष होण्याच्यादृष्टीने हा विजय राष्ट्रवादी काँग्रेससाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे प्रफुल पटेल यांनी ट्विटमध्ये म्हटले आहे.

## अरविंद केजरीवाल पुन्हा तिहारमध्ये



**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दी**

सर्वोच्च न्यायालयाने मंजूर केलेल्या अंतरिम जामिनाची मुदत संपल्यानंतर दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी रविवारी तिहार तुरुंगात शरणागती पत्करली. न्यायालयाने त्यांना लोकसभा निवडणूक प्रचारासाठी १ जूनपर्यंत अंतरिम जामीन मंजूर केला होता. त्यापूर्वी केजरीवाल यांनी कॅनॉट प्लेस येथील हनुमान मंदिरात जाऊन दर्शन घेतले, तसेच राजघाटावर जाऊन महात्मा गांधींना आदरांजली वाहिली.

केजरीवाल यांनी रविवारी सकाळी 'आप'चे नेते आणि कार्यकर्ते यांना पक्ष कार्यालयात संबोधित केले. यावेळी ते म्हणाले की, मी भ्रष्टाचारात सहभागी असल्यामुळे तुरुंगात परत जात नाही तर हुकूमशाहीविरोधात आवाज उठवल्यामुळे तुरुंगात जात आहे. ते पुढे म्हणाले की, ''मला सर्वोच्च न्यायालयाने २१ दिवस दिले होते. हे २१ दिवस अविस्मरणीय होते. मी एकही। **पान २ वर**

## एक्झिट पोल म्हणजे गुवाहाटीत कापलेल्या रेड्यांसारखा, भाजप २२५ जागांच्या पुढे जाणार नाही: सामना

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

देशात सातव्या आणि शेवटच्या टप्प्यातील मतदान पूर्ण होण्याआधीच टीव्ही वाहिन्यांनी लोकसभा निवडणुकांचे निकाल जाहीर केले व तिसऱ्यांदा नरेंद्र मोदी हेच पंतप्रधानपदाची शपथ घेतील हेसुद्धा सांगून टाकले. उत्तर प्रदेश, बिहार, प. बंगालसारख्या मोठ्या राज्यांच्या मतदानासंदर्भात संपूर्ण 'डाटा' बाहेर आलेला नाही. राज्यांतील मतदानाची सारासार माहिती न घेता 'एक्झिट पोल'वाल्या कॉर्पोरेट कंपन्यांनी बिनधास्त ठोकून दिले की, पुन्हा एकदा मोदीच येत आहेत व भाजपला आणि त्यांच्या आघाडीस (NDA) ३५० पेक्षा जास्त जागा मिळत आहेत. पण भाजप २२५ जागांच्या पुढे जात नाही व इंडिया आघाडी २९५ ते ३१० जागा जिंकून सरकार स्थापन करेल. त्यामुळे हा एक्झिट पोल (Exit Poll 2024) म्हणजे गुवाहाटीत कापलेल्या रेड्यांसारखा आहे. त्यामुळे खरा निकाल बदलणार नाही. मोदी जात आहेत हाच ४ जूनचा निकाल खरा आहे, असे भाष्य ठाकरे गटाचे मुखपत्र असलेल्या दैनिक 'सामना'तून करण्यात आले आहे.



देशात १ जून रोजी लोकसभेची निवडणूक संपल्यानंतर अनेक माध्यम संस्थांनी एक्झिट पोल्स जाहीर केले होते. बहुतांश एक्झिट पोल्समध्ये भाजपप्रणित एनडीए आघाडीला ३५० च्या आसपास जागा मिळतील, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. एक्झिट पोल्सच्या या आकडेवारीवर 'सामना'तून सडकून टीका करण्यात आली आहे. **। पान २ वर**

## 'मतदानोत्तर चाचण्यांचा अंदाज खोटा; लोकसभा निवडणुकीत चांगले यश मिळण्याचा काँग्रेस नेत्यांना विश्वास

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

लोकसभा निवडणुकीच्या अखेरच्या टप्प्याचे मतदान संपल्यानंतर प्रसिद्ध करण्यात आलेल्या मतदानोत्तर चाचण्यांचे अंदाज खोटे असल्याचा दावा काँग्रेस नेत्यांनी रविवारी केला. महाराष्ट्र, कर्नाटक, पंजाब, हरयाणा, उत्तर प्रदेश आणि राजस्थान या राज्यांमध्ये मतदानोत्तर चाचण्यांमध्ये जे अंदाज वर्तवण्यात आले आहेत, त्यापेक्षा पक्ष अधिक चांगले काम करेल, असा विश्र्वास काँग्रेस नेत्यांनी व्यक्त केला.काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश



यांनी विविध राज्यांतील प्रमुख नेते, प्रदेशाध्यक्ष आणि विधिमंडळ पक्षाच्या नेत्यांशी दृकश्राव्य संवाद साधला. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि राहुल गांधी यांनीही काँग्रेस उमेदवारांशी दृकश्राव्य माध्यमातून संवाद साधला. मतमोजणीच्या दिवशी हेराफेरीचे कोणतेही प्रयत्न रोखण्यासाठी सतर्क रहा, असा सल्ला या नेत्यांनी दिला. मतदानोत्तर चाचण्या बोगस असल्याचे राहुल गांधी यांनी यावेळी सांगितले. निवडणुकीतील हेराफेरीचे समर्थन करण्याचा हा जाणूनबुजून केलेला प्रयत्न आहे. इंडिया आघाडीच्या कार्यकर्त्यांचे मनोबल कमी करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून खेळल्या गेलेल्या मानसिक खेळाचा हा भाग आहे, असे राहुल गांधी यांनी सांगितले.

## रुग्णालये, सार्वजनिक ठिकाणी अग्निसुरक्षा प्रात्यक्षिके घ्या! पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा अधिकाऱ्यांना आदेश

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

देशात सध्या उष्णतेची लाट असून, गेल्या काही दिवसांत आगीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाली आहे. याच पार्श्र्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी महत्त्वाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेत रुग्णालये आणि सार्वजनिक ठिकाणी आग आणि विद्युत सुरक्षा तपासणी मोहीम नियमित राबवण्याचे आदेश दिले. या वेळी मोदी यांनी ईशान्येकडील राज्यात रेमल चक्रीवादळानंतर उद्भवलेल्या परिस्थितीचा आणि लोकसभेचे निकाल जाहीर झाल्यानंतर नवीन सरकारच्या आगामी १०० दिवसांच्या कार्यपद्धतीचा आढावाही घेतला.लोकसभा निवडणुकीचे 'एग्झिट पोल' शनिवारी जाहीर झाले. त्यात भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (एनडीए) मोठा विजय मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली असून, नरेंद्र मोदी सलग तिसऱ्यांदा सत्ता स्थापन करतील, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या 'एग्झिट पोल'च्या अंदाजानंतर मोदी यांनी रविवारी देशातील काही भागांतील उष्णतेच्या लाटेच्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी बैठक घेतल्याचे अधिकाऱ्यांनी निवेदनातून सांगितले.



आगीच्या घटना रोखण्यासाठी **। पान २ वर**

## संपादकीय

### शेवटी भूमिका महत्वाची..

शालेय शिक्षणाचा राज्य अभ्यासक्रम आराखडा प्रकाशित करण्यात आला आहे. अभ्यासक्रम आराखड्यात अनेक महत्त्वाच्या गोष्टी, शिक्षण प्रक्रियेविषयी नवा दृष्टिकोन, तत्त्वांचा विचार करण्यात आला आहे. आराखड्यात ज्या गोष्टी नमूद केल्या आहेत त्या सर्वांचा व्यापक विचार केला गेला तर बरेच काही साध्य होऊ शकते. शाळा, विद्यार्थी, शिक्षक, पालक, व्यवस्थापन, अध्ययन, अध्यापन, मूल्यमापन याविषयी अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका विशद करण्यात आली आहे. शिक्षणाची दिशा स्पष्ट करणारा हा एक महत्त्वाचा दस्तऐवज आहे. त्याचवेळी शिक्षणातील प्रक्रियेच्या संदर्भाने महत्त्वाची भूमिका मांडण्यात आली आहे. शिक्षणाच्या प्रक्रियेत काय घडू नये याबद्दलचा दृष्टिकोनही अधोरेखित करण्यात आला आहे. आराखड्यात म्हटले आहे की, शिक्षा आणि भीती हे शिकण्यासाठी हानिकारक आहेत. या गोष्टींचा वर्गप्रक्रियेत उपयोग केला जाता कामा नये. गतकाळात म्हटले जात असे की, छडी लागे छमछम विद्या येई घमघम. आपल्या पाल्याला मारले तरी पालक काही म्हणत नव्हते. पाल्याला शिक्षा करा, असे सांगणारे पालक होते. याचे कारण शिक्षा केली की विद्यार्थी अधिक चांगले शिकतात अशी धारणा होती. त्यामुळे शाळा आणि शिक्षा यांचे नाते पक्के होते. मात्र, जसजसे शिक्षणशास्त्र, बुध्दिशास्त्र, मानसशास्त्रातील संशोधन पुढे जात आहे, त्याप्रमाणे बालक कसे शिकते हे शास्त्रीय अंगाने समोर येत आहे. त्यामुळे शिक्षणप्रक्रियेत बदल घडत आहेत. २०१० साली या देशात बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क कायदा अस्तित्वात आला. कायद्यातील कलम १७ प्रमाणे प्राथमिक स्तरावर कोणत्याही प्रकारे शारीरिक अथवा मानसिक स्वरूपातील शिक्षा करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. तीच भूमिका राज्य अभ्यासक्रम आराखड्यातही कायम ठेवली आहे. शिक्षा केली तर कोणताही विद्यार्थी उत्तम शिकतो असे काही समोर आले नाही. शिक्षेने फार तर घोकंपट्टी घडेल. मात्र, त्यापलीकडे शिक्षण म्हणून जो प्रवास घडण्याची गरज आहे तो प्रवास भीती अथवा शिक्षेने घडत नाही. त्यामुळे पुन्हा एकदा आराखडा तीच भूमिका पुढे घेऊन जात आहे. शिक्षकांच्यादेखील काही समस्या आहेत. शिक्षा न केल्याने विद्यार्थी अभ्यास करीत नाहीत, अशी भूमिका काही शिक्षक मांडत आहेत. पालकही शिक्षा अथवा भीती नसल्याने विद्यार्थी बेशिस्त वागतात, असे म्हणत आहेत.

पान १ वरुन

### अरविंद केजरीवाल पुन्हा ..

मिनिट वाया घालवला नाही. मी देशाला वाचवण्यासाठी प्रचार केला. आम आदमी पक्ष महत्त्वाचा नाही, देश महत्त्वाचा आहे.'' केजरीवाल १० मे रोजी तुरुंगातून बाहेर आले होते. त्यांच्यावर कथित दिल्ली मद्या घोटाळ्याशी संबंधित आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप ठेवण्यात आले आहेत.भाजपच्या नेतृत्वाखाली रालोआ तिसऱ्यांदा सरकार स्थापन करत असल्याचा अंदाज व्यक्त करणाऱ्या मतदानोत्तर चाचण्या बनावट असल्याचा दावाही केजरीवाल यांनी केला. हा दबावतंत्राचा भाग असल्याचे ते म्हणाले.

केजरीवाल तिहार तुरुंगात येण्यापूर्वी, तेथील वाहतूक मर्यादित करण्यात आली होती, तसेच सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली होती. त्यांच्याबरोबर पत्नी सुनीता केजरीवाल आणि आपचे नेते होते. त्यामध्ये आतिशी, कैलाश गहलोत, सौरभ भारद्वाज, संजय सिंह इत्यादी नेत्यांचा समावेश होता.

### एक्झिट पोल म्हणजे गुवाहाटीत..

भाजपला ३५० जागा मिळाव्यात असे कोणते महान कर्तृत्व या लोकांनी गाजवले आहे? २०१४ आणि २०१९ पेक्षा मोदींना लोक भरभरून मते देत आहेत व मोदी तिसऱ्यांदा विजयी होत असल्याचे चित्र निर्माण करणे हा फक्त पैशांचा कॉर्पोरेट खेळ आहे. मोदी ध्यानाला बसले तसा आपला निवडणूक आयोगही डोळे मिटून बगळयाप्रमाणे ध्यानाला बसला आहे. अर्थात, लोकशाहीत जनता सर्वोपरी व मतदार हाच राजा आहे. ४ जूनला मतमोजणी होईल व हुकूमशाहीचा अंधकार दूर होईल. मोदींनी ध्यान केले व सूर्याला शांत केले असे भाजपवाले सांगतात. मोदी यांनी ध्यान केले तरी जनतेच्या मनात उसळलेला उद्रेक ते शांत करू शकलेले नाहीत व त्यामुळे भाजपचा पराभव होणारच आहे, असा दावा 'सामना'तून करण्यात आला आहे.

एक्झिट पोल्सच्या आकडेवारीवर शंका

ठाकरे गटाने एक्झिट पोल्सने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीबाबत शंका व्यक्त केली आहे. १ तारखेस प. बंगाल, उत्तर प्रदेशात निवडणुका झाल्या. प. बंगालातील १० जागांसाठी साधारण ५९.१५ टक्के मतदान झाले. निवडणूक आयोग चार-पाच दिवसांनी या आकड्यात आणखी पाच-दहा टक्क्यांची भर टाकेल. मग एक्झिट पोलवाल्यांनी प. बंगालमधील निकाल कोणत्या आधारावर लावले?, असा सवाल 'सामना'तून उपस्थित करण्यात आला आहे.हरयाणात एकूण १० लोकसभेच्या जागा आहेत. १० लोकसभा जागा असताना तेथे भाजपप्रणीत एनडीएला १६ ते १९ जागा मिळतील असे 'झी न्यूज'च्या एक्झिट पोलमध्ये दाखवले. हिमाचल प्रदेशात फक्त चार जागा असताना या राज्यात एनडीए सहा ते आठ जागा जिंकेल असा निकाल दिला आहे. बिहारमध्येदेखील लोक जनशक्ती पार्टी प्रत्यक्षात पाच जागांवर लढलेली असताना एक्झिट पोलमध्ये तो पक्ष सहा जागा जिंकू शकेल, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

झारखंडमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष एकच जागा लढवत असताना त्या पक्षाला तीन ठिकाणी विजय मिळेल, असा 'चमत्कार' एक्झिट पोलवाल्यांनी केला आहे. हा सर्व आकड्यांचा बनावट खेळ आहे. देशातल्या जनतेचा मूड आणि हे एक्झिट पोल अजिबात मेळ खात नाहीत. ज्या प्रकारचे आकडे समोर आणले तो सर्व सरकारी दबाव तंत्र व भाजपने फेकलेल्या पैशांचा खेळ आहे, पण पैशांच्या हव्यासापायी या 'पोल' कंपन्यांनी स्वतःचीच बेअब्रू करून घेतली. काँग्रेसने तामीळनाडूत फक्त ९ जागांवर निवडणुका लढवल्या, पण 'आज तक'च्या एक्झिट पोलने तामीळनाडूत काँग्रेसला १३-१५ जागा मिळतील अशी भविष्यवाणी केली. हे सर्व आकडे पाहिले तर एक्झिट पोलवाल्यांनी भाजपला ३५० या जागा कमीच दिल्या. लोकसभा ५४३ जागांची असली तरी भाजपला साधारण ८०० ते ९०० जागा मिळायला काहीच हरकत नव्हती, अशी खोचक टिप्पणी 'सामना'तून करण्यात आली आहे.

### रुग्णालये, सार्वजनिक ठिकाणी..

तपासणी मोहिमा नियमित राबवणे आवश्यक असल्याचे मोदी म्हणाले. जंगलात अग्निशमन रेषा राखण्यासाठी नियमित तपासणी आणि बायोमासचा उत्पादक वापर करण्याचे नियोजन केले पाहिजे, असेही ते म्हणाले. 'रेमल' चक्रीवादळानंतर ईशान्येकडील मिझोरम, आसाम, मणिपूर, मेघालया, त्रिपुरा आदी राज्यांमध्ये मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तेथील परिस्थितीची माहिती पंतप्रधान मोदींना या वेळी देण्यात आली. राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाने (एनडीआरएफ) पूरग्रस्त भागात नागरिकांचे बचावकार्य करून त्यांना सुरक्षित स्थळी हलवले. दरम्यान, या राज्य सरकारांना सर्वतोपरी मदतीचे आश्र्वासन मोदींनी या वेळी दिले.

# लोकसभा निवडणूक मतमोजणीसाठी मुंबई शहर जिल्हा प्रशासन सज्ज

## मतमोजणी केंद्रात मोबाईल, इलेक्ट्रॉनिक वस्तू आणण्यास सक्त मनाई

**मुंबई /दैनिक यशसिध्दि :**
मुंबई शहर जिल्ह्यातील मुंबई दक्षिण व मुंबई दक्षिण मध्य या दोन्ही लोकसभा मतदारसंघांची मतमोजणी ४ जून रोजी मुंबईतील शिवडी येथील वेअर हाऊस, गाडी अड्डा येथे होणार आहे. यासाठी मुंबई शहर जिल्हा निवडणूक प्रशासन सज्ज असल्याची माहिती मुंबई शहर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी संजय यादव यांनी दिली.

या परिसरात कडक पोलीस बंदोबस्त राहणार आहे. उमेदवारांचे मतमोजणी प्रतिनिधी, मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांना मतमोजणी केंद्रामध्ये मोबाईल व इतर कोणत्याही इलेक्ट्रॉनिक वस्तू घेवून जाण्यास मनाई करण्यात आली आहे. प्रवेशद्वारावर याबाबतची तपासणी करूनच मतमोजणी केंद्रामध्ये प्रवेश देण्यात येणार आहे.मा. भारत निवडणूक आयोगाने मतमोजणी निरीक्षक म्हणून मुंबई दक्षिण मध्य लोकसभा मतदारसंघासाठी मतमोजणी निरीक्षक म्हणून जी.एस प्रियदर्शी (आय.ए.एस.) व राम प्रकाश (एस.सी.एस.) तर मुंबई दक्षिण लोकसभा मतदारसंघासाठी मतमोजणी निरीक्षक म्हणून राजीव रंजन (आय.ए.एस) व नवाब दीन (एस.सी.एस.)यांची नियुक्ती केली आहे.

मतदान केंद्रावरील आवश्यक त्या सोयीसुविधा आणि उपाययोजना बाबत मुंबई शहर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी संजय यादव, मुंबई दक्षिण मध्य लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी विकास पानसरे, मुंबई दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी रवि कटकधोंड यांचा सातत्याने आढावा सुरू आहे.

मतमोजणी केंद्रावर मतदान यंत्रातील (ईव्हीएम) प्रत्येक विधानसभा क्षेत्रासाठी स्वतंत्र मतमोजणी कक्ष तयार करण्यात आले असून प्रत्येक कक्षामध्ये १४ टेबलवर मतमोजणी होणार आहे. प्रत्येक टेबलवर एक सूक्ष्म निरीक्षक, एक मतमोजणी पर्यवेक्षक, एक मतमोजणी सहाय्यक आणि एक शिपाई असे अधिकारी, कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.तसेच टपाली मतमोजणीसाठी एका लोकसभा मतदारसंघासाठी १४ टेबल व सेवा मतदारांच्या पुर्वमतमोजणीसाठी दोन स्वतंत्र कक्ष तयार करण्यात आले आहेत. सकाळी ८ वाजता निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या समक्ष टपाली मतमोजणीला सुरुवात होईल. त्यांनतर सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या समक्ष संबंधित विधानसभा क्षेत्रातील मतदान यंत्रावरील मतमोजणीला सुरुवात होईल.

मतदान फेऱ्या मुंबई दक्षिण लोकसभा मतदारसंघ

विधानसभा मतदारसंघनिहाय मतमोजणी होणार आहे. यामध्ये वरळी विधानसभा मतदारसंघ १८, शिवडी -१९, भायखळा -१९, मलबार हिल-२०,मुंबादेवी -१६, कुलाबा -२० अशा फेऱ्या होणार आहेत.

मुंबई दक्षिण मध्य लोकसभा मतदारसंघ

अणुशक्तीनगर विधानसभा मतदार संघ-१९, चेंबूर- २१, धारावी-१९, शीव-कोळीवाडा -१९, वडाळा-१८, माहिम १८,अशा फेऱ्या असतील.

सैनिक मतदारांच्या मतपत्रिका छाननीसाठी स्थापित ईटीपीबीएमएस कक्ष, एनकोअर प्रणालीवर माहिती भरण्यासाठी स्थापित कक्ष, सर्व मतमोजणी कक्षातील फेरीनिहाय, उमेदवारनिहाय आकडेवारीची सारणी तयार करण्यासाठी स्थापित टॅब्युलेशन कक्ष आदी विविध कक्षात अधिकारी, कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतमोजणीनंतर ईव्हीएम आणि सांविधानिक व असांविधानिक लिफाफे सील करण्यासाठी विधानसभा मतदारसंघनिहाय वेगवेगळी पथके गठीत करण्यात आली आहेत. प्रत्येक टेबलवर उमेदवारांनी नियुक्त केलेल्या मतमोजणी प्रतिनिधींना त्या टेबलवर कोणकोणत्या मतदान केंद्रावरील मतमोजणी होणार आहे, याबाबत माहिती देणारे फलक मतमोजणी कक्षात लावण्यात आले आहेत.

मतमोजणी केंद्र परिसरात प्रवेश करताना पोलिसांकडून प्रत्येक व्यक्तीची तपासणी केली जाणार असून अधिकृत पास असल्याशिवाय कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. तसेच प्रवेशद्वारापासूनच मतमोजणी प्रतिनिधी आणि मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र प्रवेशाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच जागोजागी दिशादर्शक फलक लावून मतमोजणी कक्षातील प्रवेशाबाबत माहिती देण्यात आली आहे.

* मतमोजणी केंद्राच्या ३०० मीटर परिसरात मनाई आदेश लागू*

जिल्ह्यातील लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची मतमोजणी संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने मनाई आदेश लागू करण्यात आले आहेत. निवडणुकीच्या संदर्भात गुंतलेला अधिकारी किंवा अशा मतमोजणी केंद्रावर किंवा त्यांच्या परिसरात कर्तव्यात गुंतलेल्या कोणत्याही लोकसेवकाशिवाय इतर कोणत्याही व्यक्तीने दिनांक २ जून २०२४ रोजी सकाळी ६:०० ते दिनांक ५ जून २०२४ मध्यरात्री १२.०० वाजेपर्यंत शिवडी येथील मतमोजणी केंद्रापासून अथवा मतमोजणी केंद्राच्या परिसरापासून ३०० मीटर त्रिज्येच्या अंतरात, महामार्ग रस्ता, गल्लीबोळ किंवा इतर कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी फिरणे किंवा कोणत्याही लोकांच्या सभा किंवा गट तयार करण्यास व सामील होण्यास मनाई असेल, असे आदेश पोलीस उपायुक्त (अभियान) बृहन्मुंबई यांनी निर्गमित केले आहेत.

मतमोजणी केंद्र परिसरात स्वतंत्र मिडिया सेंटर तयार करण्यात आले असून भारत निवडणूक आयोगाकडून प्राधिकरपत्र (पासेस) दिलेल्या प्रसारमाध्यम प्रतिनिधींना याठिकाणी प्रवेश दिला जाणार आहे. प्रसार माध्यम प्रतिनिधींना सुध्दा केवळ मिडीया सेंटरमध्येच मोबाईलचा वापर करता येईल. प्रत्यक्ष मतमोजणी केंद्रात जातांना मोबाईल मिडीया सेंटर येथे जमा करावा लागेल.

# मतमोजणी कक्षातील कामकाजाचा जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांच्याकडून आढावा

**सांगली/दैनिक यशसिध्दी न्यूज**
सांगली लोकसभा मतदारसंघाच्या मतमोजणीच्या अनुषंगाने मतमोजणी कक्षात सुरू असलेल्या कामकाजाचा सूक्ष्म आढावा जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी तला आणि येथील अधिकाऱ्यांना कामकाजाबाबत आवश्यक त्या सूचना केल्या.४४- सांगली लोकसभा मतदार संघात ७ मे रोजी झालेल्या मतदानाची मतमोजणी येत्या ४ जून २०२४ रोजी वेअर हाऊसिंग कॉर्पोरेशन मिरज येथे होणार असून जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी आज मतमोजणी कक्षातील कामांची पाहणी केली. यावेळी पोलीस अधीक्षक संदीप घुगे, अपर पोलीस अधीक्षक रितू खोखर, उप जिल्हा निवडणूक अधिकारी नीता शिंदे, उपजिल्हाधिकारी डॉ. विकास खरात, उपजिल्हाधिकारी दीपक शिंदे, उपजिल्हाधिकारी दादासाहेब कांबळे, उपजिल्हाधिकारी राजीव शिंदे, उपजिल्हाधिकारी सरिता लष्करे, उपजिल्हाधिकारी डॉ. स्नेहल कनिचे यांच्यासह पोलीस व संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी सांगितले, मतमोजणीसाठी आयोगाच्या सुचनांनूसार निश्र्चित केलेल्या आणि ओळखपत्र वितरीत केलेल्या अधिकारी, कर्मचारी, मतमोजणी प्रतिनिधी आणि माध्यम प्रतिनिधी यांना प्रवेश असणार आहे. मतमोजणी प्रक्रिया सुव्यवस्थित पार पाडण्यासाठी मतमोजणी केंद्रावर सुरक्षेच्या अनुषंगाने उपाययोजना केल्या आहेत. अधिकारी कर्मचाऱ्यांनी त्यांना नेमून दिलेले काम जबाबदारीने पार पडावे अशा सूचना त्यांनी दिल्या.यावेळी जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी मतमोजणी कक्षातील सीसीटीव्ही, संगणक, बॅरीगेट, आत येण्याचा व बाहेर जाण्याचे मार्ग, ईव्हीएम मतमोजणी केंद्रात नेण्याचा मार्ग, पोलीस सुरक्षा, माध्यम कक्ष आदी ठिकाणी भेट देवून येथील कामांबाबत संबंधितांना आवश्यक सूचना केल्या.जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी यासीन पटेल यांनी मतमोजणी कक्षातील संगणकीय कामकाज, सीसीटिव्ही व अनुषंगिक कामकाजाबाबत केलेल्या कामांची माहिती जिल्हाधिकारी यांना दिली.

# अवैध वाळु उपशाचं पाप उघड होईल म्हणून जिल्हाधिकार्यांना चंद्रभागेपासुन दूर ठेवले काय? : गणेश अंकुशराव

**पंढरपूर/प्रतिनिधी:** चंद्रभागेच्या पात्रात होणारा अवैध वाळु उपसा जिल्हाधिकारी यांना कळू नये, वाळु उपशाचं पाप उघड होईल म्हणून जिल्हाधिकारी यांना आषाढीच्या पार्श्वभुमीवरील पाहणीसाठी चंद्रभागेच्या पात्रात महसुल अधिकार्यांनी नेले नाही काय? असा सवाल महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी उपस्थित केला आहे. आषाढी यात्रेच्या पार्श्र्वभूमीवर पालखी तळांवर, मार्गावर वारकरी व भाविकांना कोणतही अडचण निर्माण होऊ नये तसेच भाविकांना पालखीतळावर प्रशासनाच्यावतीने अधिकच्या आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज पालखी तळांची आणि पालखी मार्गाची पाहणी केली. परंतु चंद्रभागेच्या पात्राकडे त्यांना नेण्याचे महसुल अधिकार्यांनी टाळले, यामुळे गणेश अंकुशराव यांनी तीव्र नापसंदी व्यक्त केली आहे.

चंद्रभागेच्या पात्रातील अवैध वाळु उपशामुळं पडलेल्या खड्ड्यांचा प्रश्न कायम असुन याविरुध्द आम्ही वारंवार वेगवेगळी आंदोलनं केली परंतु पंढरपुरमधील माजी व आजी महसुल अधिकारी मात्र याकडे अक्षम्य दुर्लक्ष करत आहेत, आषाढी वारी तोंडावर आलेली असतानाही चंद्रभागेच्या पात्रात पडलेले खड्डे बुजवले गेले नाहीत, चंदेभागेमध्ये गटाराचे पाणी सोडले जाते, या सर्व बाबी कार्यक्षम जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्या निदर्शनास आणुन देणेसाठी पंढरपुरातील महसुल अधिकारी यांनी त्यांना चंद्रभागा वाळवंट व नदीपात्राची पाहणी करण्यासाठी नेणे आवश्यक होते, परंतु जाणुन-बुजून या महसुल अधिकार्यांनी आपले पाप उघडकीस येण्याच्या भीतीने जिल्हाधिकारी यांना चंद्रभागेच्या पाहणी दौर्यासाठी नेले नाही. असा आरोप गणेश अंकुशराव यांनी केला असुन आता पुन्हा जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांना चंद्रभागा नदी पात्राची पाहणी करण्याची विनंती करणार असल्याची माहितीही त्यांनी दिली आहे.

आषाढी शुद्ध एकादशी सोहळा १७ जुलै २०२४ रोजी होणार असून, या सोहळ्यासाठी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्र्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याचे ११ जुलै तर जगदुरु संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याचे १२ जुलै २०२४ रोजी सोलापूर जिल्ह्यात आगमन होणार आहे. या पालखी सोहळ्याबरोबर तसेच अन्य संताच्या पालखी सोहळ्यासोबत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. या सर्व वारकरी भाविकांना पालखी मार्ग, विसावा तसेच पालखी तळांवर आवश्यक असलेल्या सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यास सर्व संबंधित प्रशासकीय यंत्रणांनी प्राधान्य द्यावे. तसेच प्रशासकीय यंत्रणांनी परस्परात योग्य समन्वय ठेवून दिलेले जबाबदारी चोखपणे पार पाडावी, अशा सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्या.

यावेळी त्यांच्या समवेत जिल्हा पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर जिल्हाधिकारी मोनिकासिंग ठाकूर, प्रांताधिकारी सचिन इथापे, माळशिरसच्या प्रांताधिकारी विजया पांगारकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, तहसिलदार सचिन लंगुटे, सुरेश शेजुळ, गटविकास अधिकारी सुशील संसारे, सा.बां.कार्यकारी अभियंता अमित निंबकर, सुनिता पाटील, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.एकनाथ बोधले,नायब तहसिलदार मनोज श्रोत्री यांच्यासह संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद हे कार्यतत्पर अधिकारी असल्याने त्यांच्याकडून सर्वसामान्य जनतेच्या व वारकरी भाविकांच्या अपेक्षाही वाढल्या आहेत. त्यांच्या कार्यकाळात चंद्रभागेतील अवैध वाळु उपशाचा व अस्वच्छतेचा प्रश्न कायमस्वरुपी मिटावा अशी आमची अपेक्षा असुन आम्ही स्वत: याबाबत जिल्हाधिकारी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्या निदर्शनास वस्तुस्थिती आणून देणार असल्याची माहितीही यावेळी गणेश अंकुशराव यांनी दिली आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

## यशोधरा बुद्ध विहारास आनंदराज आंबेडकर यांची भेट



**उल्हासनगर /बाळासाहेब अहिरे**

उल्हासनगर येथील यशोधरा बुद्ध विहार फाउंडेशनच्या वतीने बाल शिबिर संस्कार संपन्न या कार्यक्रमाला मा आनंदराज आंबेडकर साहेब या ठिकाणी प्रमुख पाहुणे उपस्थित होते त्याचप्रमाणे आनंदराज आंबेडकरांचे स्वागत मोठ्या उत्साहात करण्यात आले .या कार्यक्रमाला विविध विभागातील पदाधिकारी कार्यकर्ते बौद्धउपासक उपासिका बाल बालिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ईटकुर येथे अहिल्यादेवी होळकर यांची जयंती पारंपारिक पद्धतीने साजरी

**कळंब/सुधाकर रणदिवे :**

कळंब तालुक्यातील ईटकुर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मोठया उत्सवात साजरी करण्यात आलीयावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून अहिल्यादेवी होळकर यांचे माहेर कडील वंशज अक्षय शिंदे चौंडी यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून मीरवणूकीस सुरुवात करण्यात आली.

सकाळी ११ ते ५ पर्यंत जयंती उत्सव समितीच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

नंतर मिरवणूकीस सुरुवात झाली ही मीरवणुक पारंपरिक पद्धतीने काढण्यात आली यात चिमुकल्यांना अहिल्यादेवी होळकर यांचा पोषाख परिधान करून घोड्यावर बसून तलवार हातात देण्यात आली होती.तसेच यात विविध प्रकारचे ढोल पथक, कोल्हापूर येथील खंडोबा वसारीवाले वाघे , हलकी पथक, जागरण गोंधळाचे संभळ, घोडे लायटिंग शो च्या रथाच्या माध्यमातून अहिल्यादेवी होळकर यांच्या मुर्तीची गावभर भंडार्याची उधळण करत मीरवणुक काढण्यात आली.

हि मीरवणुक एक आगळ्या वेगळ्या प्रकारे असल्यामुळे ईटकुर व परीसरातील नागरीकांनी पाहण्यासाठी मोठी गर्दी केली होती.. मीरवणुक यशस्वी होण्याकरिता



कमिटिचे अध्यक्ष सतिश कस्पटे,उप अध्यक्ष आकाश दाने, गणेश गिरे, राजेंद्र घाटुळे, देविदास गायके, श्रीराम वाघमारे,बालाजी घाटूळे, संतोष कस्पटे,लखन गिरे,दत्ता दाने ,शिवाजी गिरे, नवनाथ गायके,केशव कस्पटे ,प्रभाकर दाणे, मालोजी वाघमारे, तुषार घाटूळे, प्रशांत घाटूळे, विशाल घाटूळे, अमर गीरे ,कीशोर गीरे, प्रणव गिरे,अशोक गिरे, सचिन गिरे, दादा कस्पटे,दादा वाघमारे, वैभव कस्पटे,संपत गिरे, चांगदेव कोरडे, विक्रम कोरडे, आश्रुबा गीरे,अर्जुन गिरे, अक्षय कस्पटे,सुशिल कस्पटे,आदींनी परिश्रम घेतले.

## १० वी १२ वी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या मुला-मुलीचा गुणगौरण सोहळा

**उल्हासनगर/ बाळासाहेब अहिरे**

आज दिनांक ३१/०५/२०२४ रोजी मा. प्रशासक तथा आयुक्त यानी चला वळू या ध्येयाकडे या संकल्पनेतून १० वी १२ वी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या मुला-मुलीचा गुणगौरण सोहळा उल्हासनगर महापालिकेत पार पडला. सदर सोहळ्यात खालीलप्रमाणे उपस्थिती होतो.

मुख्य अधिकारी पिंजारी, अतिरिकत् आयुक्त जमीर लेंगरेकर, सहा. संचालक, नगररचना ललीत खोब्रागडे, उप-आयुक्त किशोर गवस, डॉ. सुभाष जाधव, सहा. सार्वजनिक आरोग्य अधिकारी श्री. मनिष हिवरे, महापालिका सचिव प्राजक्ता कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी छाया डांगळे, उप लेखा अधिकारी श्रीम. निलम कदम, मुख्य बाजार निरीक्षक विनोद केणे, मुख्य अग्निशामन अधिकारी बाळू नेटके, विधी अधिकारी, राजा बुलानी, क्रीडा अधिकारी शांताराम चौधरी, उद्यान अधिक्षक दिप्ती पवार, पर्यावरण विभाग प्रमुख , विशाखा सावंत , सहायक आयुक्त ,गणेश शिंपी, दिव्यांग विभाग प्रमुख राजेश घनघाव इत्यादी अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते.



या गुणगौरव सोहळ्यात मा. प्रशासक तथा आयुक्त डॉ. अझीझ शेख यांचेमार्फत सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच उपजिल्हाधिकारी, सागर धनाजी मुळीक, व ए.बी.डी.ओ. दिक्षा पाटील यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर यांची मुलगी अरिबा जमीर लेंगरेकर ही १० वीमध्ये ९०% गुणांनी उत्तीर्ण झाल्याबद्दल, सहा. संचालक नगररचना ललीत खोब्रागडे यांचा मुलगा मध्यांश ललीत खोब्रागडे हा १० वीमध्ये ९७% गुणांनी उत्तीर्ण झाल्याबद्दल, तसेच सहा. सार्वजनिक आरोग्य अधिकारी श्री. मनिष हिवरे यांची मुलगी सौम्या मनिष हिवरे ही १२ वीमध्ये ९५% गुणांनी उत्त्रीर्ण झाल्याबद्दल महापालिका आयुक्तांनी कौतुक केले. तसेच इतर अधिकारी कर्मचारी यांच्याही मुलांचे परीक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल कौतुक केले व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सदर गुणगौरव सोहळयास महापालिका आयुक्तांनी मोलाचे मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाची प्रस्तावना अतिरिक्त आयुक्त, जमीर लेंगरेकर. यांनी मांडली. व कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी छाया डांगळे यांनी केले शेवटी कार्यक्रमाची सांगता उप-आयुक्त डॉ. सुभाष जाधव यांनी केली.

## परंपरागत झुरवे करताहेत सामाजिक प्रबोधन...!

### झुरव्यांची जागा डीजेने घेतली : घोडा नाचविणे दिसत नाही.

**मुन्नाभाई नंदागवळी बाराभाटी :**

महाराष्ट्र हा साधू-संत, महात्मे यांचा प्रदेश असला तरी याच राज्यात नानाविध कला, कौशल्य आणि लोककला, लोकनाट्यंचा भाग आहे. आपल्या ग्रामीण भागात अनेक लोककला आणि लोकनाट्य ही काही भागात आजही धूम धडाक्यात चालतात. मोठ्या आवडीने सादरीकरण करताना आढळतात. पण



लोकनाट्यातील झुरवे हे गेल्या १०-१५ वर्षापासून कालबाह्य झाल्याचे चित्र दिसू लागले आहे. त्याची आजही नितांत गरज समाजाला आहे. या झुरव्यांची जागा आता डीजे म्युझिकनी घेतली आहे. पण परंपरागत झुरवे हे सामाजिक प्रबोधनाचे कार्य करतात. हे मात्र विसरता येणार नाही.

लोककला व लोकनाट्य ही आपल्या भागाची व समाजाची एक प्रतिमा आहे. तमाशा, दंडार, पोवाडा, भजन अशाप्रकारे झुरवे सादरीकरण करणे हे समाज प्रबोधन करण्याचे काम आहे. हे झुरवे लग्न कार्यक्रमाच्या वेळी नवरदेवाने लग्न लावून नवरीला आपल्या हक्काच्या घरी परत आणतात. गावाला जेवन देतात. आणि लग्नासाठी आलेल्या पाहूणे मंडळीचे मनोरंजन करावे म्हणून त्यावेळी झुरवे सादरीकरण केले जातात.

तपन तपे हिवरी-पिवरी, हिला बासिंग बांधा करा नवरी...

अशाप्रकारे झुरवे हे लोकनाट्य सादर केले जातात. यामध्ये काहीसा मनोरंजन असते तर काही भाग हा जीवनाला वळण देणारा असतो. याप्रसंगी झुरवे सादर करताना एक कलाकार हा लाकडी घोडा तयार करतात. त्याला सजावट करून रंगरंगोटी करतात. त्याला कापड लावतात. मग ते कमरेला बांधून नाचविणे सादर करतात. डफाच्या आवाजावर ताल धरतात. यामध्ये झुरवे गीत म्हणत रात्रभर सादरीकरण केले जातात. आता हे सध्या फारसे दिसत नाही. यांची जागा डीजे म्युझिकने घेतली आहे.

परंतु काही भागात ही परंपरा आजही तसीच कायम आहे. तशी ही आदिवासी भागात जास्त पंसती असल्याने हे लोकनाट्य कायम अनेक कलावंताच्या व रसिकांच्या मनावर अधिराज्य करीत आहे. हे डीजे ऐवजी केव्हाही चांगले आहे. डीजेमूळे समाज प्रबोधन होत नाही.

नृत्यविष्कार ही आपली ओळख

आपल्या राज्यात व राज्याच्या भागात नृत्य हे फार पसंतीचे क्षेत्र आहे. यामध्ये अनेकांनी आपली छाप पाडली आहे. हाच धागा झुरवे सादरीकरणात पण कलावंतांनी काबीज केली आहे. लाकडी घोडा नाचविणे हे तसे कठीण काम आहे. पण नृत्यविष्काराला आजही पसंती दिली आहे.

## सामूहिक पारायण सोहळा अमरावती येथे मोठ्या उत्साहात संपन्न



**अमरावती/दैनिक यशसिध्दी**

श्री परमहंस परशराम महाराज सेवाधारी परिवार जलकुंड पिंपळोद चे सामूहिक पारायण सोहळा अमरावती येथे मोठ्या उत्साहात संपन्न ९०० भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

कोट्यवधी भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री परमहंस परशराम महाराजांच्या सामूहिक परायण सोहळ्याची श्री अंबादेवी संस्थान अमरावती कीर्तन सभागृहात १ जून रोजी भक्तिमय वातावरणात सांगता झाली. सकाळी ८.३० वाजता परमहंस परशराम महाराज महिमा ग्रंथाचे पारायण सुरू झाले. यात भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. गेल्या आठवडाभरापासून तयारी सुरू होती. त्यात अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम, वर्धा, सोलापूर, जळगाव, बुलढाणा, जिल्ह्यातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले. यात ९००-१००० भाविक भक्तांनी सहभागी दर्शविली . श्रीक्षेत्र शेगाव येथे पुढील सामूहिक पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती जयंत (बाप्पू) वानखडे यांनी दिली. या कार्यक्रमामुळे संपूर्ण परिसर धार्मिकतेने भरून गेला.

त्यासाठी पंधरवड्यापासून सुरू झालेल्या नोंदणी मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. १२४ वर्षांपूर्वी १४ मे १९०० रोजी भातकुली तालुक्यातील जैतापूर (गुरव) गावात भीमाबाई बळीराम (गुरव) वडनेरकर यांच्या पोटी परमहंस परशराम महाराजांचा जन्म झाला. सकाळी ८ वाजता महाराजांच्या ग्रंथाची दिंडी श्री निळकंठेश्र्वर संस्थान निळकंठ चौक बुधवारा अमरावती येथून काढण्यात आली. ८.३० वाजता सामूहिक पारायण सोहळ्याला सुरुवात झाली.

पारायण व आरतीनंतर शेकडो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. गावाबाहेरून आलेल्या भाविकांच्या राहण्याची व भोजनाची व्यवस्थाही आयोजक सेवाधारी परिवार कडून करण्यात आली होती. भाविक भक्तांमध्ये पारायणाचा प्रचंड उत्साह होता. बसण्यासाठी ड्रेसकोड ठरलेला होता. पुरुष पांढरा शर्ट, पांढरा पायजमा आणि स्त्रिया लाल किंवा पिवळी साडी. या कार्यक्रमाला लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुख्य सेवाधारी जयंत सुरेश वानखडे व सेवाधारी परिवार जलकुंड पिंपळोद यांनी श्री परमहंस परशराम महाराज सामूहिक पारायण सोहळा यशस्वितेसाठी हातभार व सहभाग लावलेल्या सर्वांचे आभार मानले.

## कर्जापाई शेतकऱ्याची आत्महत्या गळफास घेऊन शेतकऱ्यांनी संपवली जीवन यात्रा

### सततची नापिकी व आर्थिक विवंचेतून घेतला जगाचा निरोप

**बुलढाणा/ राहुल साबळे**

चिखली तालुक्यातील मेरा बुद्रुक येथील शंकर झुंगाजी डोंगरदिवे वय ६६ वर्ष यांनी आज सकाळी दिनांक ०२ जुन २०२४ रोजी त्यांच्या शेताशेजारील अशोक नारायण पडघान गट नंबर १६८ यांच्या धुऱ्यावरील रामफळ या झाडाच्या दक्षिणेकडील फांदीला दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. त्यांच्याकडे सामायिक क्षेत्रामध्ये गट नंबर २१० व २१३ मध्ये दोन एकर नऊ गुंठे जमीन आहे. सततची नापिकी, मालाचे पडलेले भाव, यांत्रिकी शेती झाल्यामुळे शेतीचा खर्च वजा जाता बाकी काही राहत नाही. त्यामुळे त्यांचे आर्थिक परिस्थिती ढासळलेली होती. आता समोर पेरणीचे दिवस आले असताना आणखीन शेतीला खर्च कुठून लावायचा ,आर्थिक तडजोड कशी करायची या विवंचनेत ते होते. घटनेची माहिती मिळताच महसूल विभागाचे कर्मचारी



कोतवाल सचिन पडघान व मेरा बुद्रुक पोलीस पाटील बद्री पडघान यांनी अंढेरा पोलीस स्टेशनला माहिती दिली. माहिती मिळताच अंढेरा पोलीस स्टेशनचे कर्मचारी अमलदार गणेश देढे व वायाळ यांनी घटनास्थळी येऊन पंचा समक्ष पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी चिखली येथे सरकारी दवाखान्यात पाठवण्यात आला. आत्महत्याग्रस्त शेतकरी शंकर झुंगाजी डोंगरदिवे यांच्या पश्र्चात त्यांची पत्नी एक मुलगा आणि दोन मुली असा परिवार आहे. पुढील तपास अंढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमदार देढे हे करीत आहे.

## घोळसगाव येथील शंभु महादेव प्रशालेची विद्यार्थिनी वैभवी पाटील मराठी माध्यमात शाळेत आली सर्वप्रथम

**अक्कलकोट/महेश गायकवाड**

घोळसगाव येथील शंभु महादेव प्रशालेची विद्यार्थिनी वैभवी पाटील विजयकुमार पाटील ही विद्यार्थिनी मराठी माध्यमात शाळेत सर्वप्रथम आली आहे.वैभवी पाटील सर्वप्रथम आल्यामुळे येथील जगदंब प्रतिष्ठान च्या वतीने सत्कार करण्यात आला आणि तिचे अभिनंदन करण्यात आले. घोळसगाव येथील श्री शंभू महादेव विद्या मंदिरची कु. वैभवी विजय कुमार पाटील ही विद्यार्थिनी मराठी माध्यम मध्ये सर्वप्रथम आली आहे. कु. वैभवी पाटील मराठी माध्यमात शाळेत सर्वप्रथम आल्यामुळे सर्व स्तरातून तिचे अभिनंदन केले जात असून येथील जगदंब प्रतिष्ठान च्या वतीने उमेश अप्पा साळुंखे यांनी अभिनंदन करुन वैभवी हिला पुढील शिक्षणासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.अक्कलकोट तालुक्यातील घोळसगाव येथील श्री शंभू महादेव विद्या मंदिर या शाळेचा इयत्ता १० वी परीक्षेचा मराठी माध्यमाचा निकाल अतिशय उत्कृष्ट १०० टक्के लागला असुन यात वैभवी विजयकुमार पाटील सर्वप्रथम आली आहे.मराठी माध्यमात श्रुतिका शेडजाळे ही विद्यार्थिनी ८८ टक्के घेउन उत्तीर्ण झाली आहे तर याच शाळेची



संध्या पाटील हिने ८६.६० टक्के गुण मिळवून शाळेत तृतीय आली आहे. या शाळेच्या कन्नड माध्यमाची विद्यार्थिनी ऐश्र्वर्या मठपती ही ९०.६० टक्के गुण मिळवून सर्वप्रथम आली आहे तर मुनेश्र्वरी कत्ते ही विद्यार्थिनी ८६टक्के गुण घेवुन द्वितीय आली आहे तर अंकिता सुरापूरे हिने ८५.६० टक्के गुण मिळवून तृतीय आली आहे या सर्व विद्यार्थिनिंचे शाळेचे चेअरमन अध्यक्ष सचिव यांच्या सह सर्व संचालकांनी अभिनंदन केले आहेत.

# शालेय अभ्यासक्रमात मनाचे श्लोक, भगवद्गीता, मनुस्मृती, संदर्भ देण्याच्या निंदनीय प्रकाराबद्दल जाहीर निषेध

**धाराशिव/सुधाकर रणदिवे**

महाराष्ट्र शासनाच्या शालेय अभ्यासक्रमात महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्थेने जाहीर केलेल्या अभ्यासक्रम आराखड्यात मनाचे श्लोक, भगवद्गीता, मनुस्मृतीचे श्लोक, घुसडण्याचा सूचना दिल्याचे प्रसार माध्यमातून ज्ञात झाले आहे. याचा धाराशिव जिल्ह्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरवादी पुरोगामी स्त्री,पुरुष जनतेने जाहीर निषेध करण्यात आला. असे प्रकार थांबवण्यासाठी राज्यपाल महोदयांना निवेदन उप जिल्हाधिकारी धाराशिव यांच्याकडे देण्यात आले.



ज्या मनुस्मृतीत ब्राह्मणेत्तर अस्पृश्य समाज, स्त्री वर्गाची विटंबना करण्यात आली आहे. तो मनुस्मृति ग्रंथ भारताचे प्रखंड पंडित थोर समाज सुधारक विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सन १९२७ साली महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रह प्रसंगी जाहीर दहन केले होते. त्या चातुर्वर्ण्य पुरस्कृत मनुस्मृतीचे उच्चाटन करून स्वातंत्र्य,समता, बंधुता, व न्याय या अखिल मानव समूहाचे धारण करण्याच्या तत्त्वावर भारतीय संविधानाची उभारणी केली. ते पवित्र संविधान जुन्या रुढी व परंपरावादी अंधश्रद्धा महाराष्ट्र शासनाच्या शालेय अभ्यासक्रमात घुसडून कलंकित करण्याचा प्रयत्न केला जात आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, छत्रपती राजश्री शाहू महाराज, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ,राष्ट्रसंत गाडगे महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, प्रबोधनकार ठाकरे यांच्या पुरोगामी महाराष्ट्रातील शालेय विद्यार्थ्यांच्या हातात विज्ञाननिष्ठ शैक्षणिक साहित्य देण्याऐवजी अंधश्रद्धा रुढी परंपरा आधारित समाज व्यवस्था उध्वस्त करणाऱ्या दंतकथा आधारित पुस्तके देत आहेत याचा आम्ही तीव्र निषेध करत आहोत. महाराष्ट्र शासनाने सबब भगवद्गीता, मनाचे श्लोक, मनुस्मृती, संदर्भ यांना शालेय अभ्यासक्रमात स्थान देण्याचा निर्णय रद्द करणे बाबत आदेशित, निर्देशित करावे व त्या ऐवजी जगाला ज्ञान देणाऱ्या भगवान गौतम बुद्ध, संत कबीर,संत तुकाराम महाराज, महात्मा फुले यांचे अखंड, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची ग्रामगीता, संत गाडगेबाबा यांचे विचार, यांचा शालेय अभ्यासक्रमात समावेश करण्यात यावा. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना अंधश्रद्धा रूढी परंपरे कडे अंधाराकडे घेऊन जाणारा हा निर्णय रद्द केला नाही तर मनुस्मृती दहनाचा कार्यक्रम करण्यात येईल असे आवाहन करण्यात आले. असे आव्हान करण्यात आले. कर्मचारी निवेदन देताना कास्ट्राईब कर्मचारी कल्याण संघटनेचे महाराष्ट्राचे अतिरिक्त महासचिव हरिभाऊ बनसोडे, युवा भीमसेनेचे धाराशिव जिल्हाध्यक्ष महादेव भोसले, संबोधी ग्रुपचे धनराज नाईकवाडे, रिपाई खरात गटाचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ राऊत, तालुकाध्यक्ष संपत सरवदे, साहित्यिक विजय गायकवाड, युवा भिम सेनेचे तालुकाध्यक्ष अजित कदम, ज्येष्ठ नागरिक यशवंत पेटे, सत्यशोधक समाज चळवळीचे अरुण माने, आरपीआय आठवले गटाचे भालचंद्र कटारे, गुरुकुल कोचिंग क्लासेस संचालक इंजि. राहुल जगताप, लहु खंडागळे, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अजय वाघाळे व इतर सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी स्वतःशी स्पर्धा करून ध्येय गाठावे : व्याख्याते विठ्ठल कांगणे

## माझा फोकस फिक्स आहे मला कोण व्हायचंय आणि कुठं जायचंय : चेअरमन अभिजीत पाटील



**पंढरपूर/प्रतिनिधी :**



श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांच्या पुढाकाराने पंढरपूर तालुक्यातील इयत्ता १०वी आणि १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी घे भरारी मार्गदर्शन शिबिर सुप्रसिद्ध व्याख्याते, विठ्ठल कांगणे सर यांच्या व्याख्यानाचे रूक्मिणी सभागृह, पंढरपूर येथे आयोजन करण्यात आले होते.अतिशय सुंदर आणि गावरान भाषेमध्ये विद्यार्थ्यांची कान उघडणी करून आपल्याला आपलं ध्येय गाठायचे आणि स्वतःची स्पर्धा स्वतः करायची अशा सोप्या भाषेमध्ये महाराष्ट्रातील प्रसिद्ध असलेले व्याख्याते मार्गदर्शक विठ्ठल कांगणे सर यांनी उपस्थित हजारो विद्यार्थी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले..सामाजिक व राजकीय जीवनात वाटचाल करताना अनेक अडचणी व चढ-उतार आयुष्यात येत असतात, परंतु, या सर्व गोष्टींना न घाबरता पुढे जायचे असते. मी माझे ध्येय व लक्ष निश्चित केले आहे व मला कुठे जायचं आहे, हे मी ठरवले आहे, असे मत विठ्ठल सहकारी कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी व्यक्त केले.

तसेच अभिजीत पाटील यांनी नेहमी आपल्या कार्यातून समाजासाठी व जिल्ह्यातील सर्व सामाजिक घटकांना न्याय देण्यासाठी विविध सूक्त उपक्रम राबवत असतात. त्यांच्या पुढाकाराने आयोजित 'घे भरारी मार्गदर्शन शिबिरामुळे' विद्यार्थ्यांना मोठा लाभ होणार आहे.यावेळी डॉ.बी.पी रोंगे, सुभाषराव माने सर, उत्तमराव कोकरे, पी.जे.सावंत सर, कालिदास कवडे सर, सिकंदर ढवळे सर, प्रमोद पाठक सर, रजनीताई जाधव मॅडम, ऊंडे मॅडम, कैलास करांडे सर, औदुंबर गायकवाड सर, जे.बी. गायकवाड सर, पिसे सर, प्रशांत पाटील सर, गणपत मोरे सर, व्ही.एम.कुलकर्णी सर, डी.वाय.पाटील सर, कोंडलकर सर, महादेव लवटे सर, व्ही एस शेळके सर, गाजरे सर मुख्याध्यापक कृषी विद्यालय शेळवे यासह आधी मान्यवर उपस्थित होते...

# महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव निमित्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते;जंगी कुस्तीचे उद्घाटन



**अक्कलकोट/प्रतिनिधी**

तालुक्यातील सदलापूर येथे जगज्योती महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव निमित्त जंगी कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते रविवारी करण्यात आले.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली आणि संकल्पनेतून जानेवारी २०२४ महिन्यापासून अक्कलकोट तालुक्यातील ७५ पैलवान सोलापूर, पुणे, कोल्हापूर, धाराशिव, छत्रपती संभाजी नगर येथे आहेत. अशा कुस्तीगीरासाठी प्रति महिना पैलवानासाठी आवश्यक असे तूप, बदाम, खारीक, बडीशेप,धने, खसखस, इलायची, इत्यादी पदार्थ दिले जाते या उपक्रमाचा अक्कलकोट तालुक्यातील पैलवानांनी लाभ घेऊन कुस्ती क्षेत्रात अक्कलकोट तालुक्याचे नावं महाराष्ट्रभरात

**सार्थ ठरत आहे :**

**महाराष्ट्राला कुस्तीची मोठी परंपरा आहे. कुस्ती खेळाला अक्कलकोट तालुक्यात भरभराटीचे दिवस प्राप्त होत आहेत. याकरिता श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाने पुढाकार घेतल्याने प्रसादरूपी खुराक या योजनेचे योगदान सार्थ ठरत आहे.**

चमकवावे असे उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.याप्रसंगी अक्कलकोटचे विजय माने, अतिश पवार व कुस्ती अध्यक्ष पै.आकाश बनसोडे, सदलापुरची कन्या व महाराष्ट्र चॉम्पियन पै. धरती बनसोडे, पै.विकास बनसोडे, मल्लिकार्जुन मुलगे, शिवानंद पटणे, भिमाशंकर बंदिछोडे, मल्लिकार्जुन पाटील, बसवराज चीतले, उल्हास पाटील, अहमद जमादार, मल्लिनाथ पाटील, सोमनाथ पाटील, बसवराज बनसोडे, गुरुलिंगप्पा पाटील, अजय पाटील, अर्जुन पात्रे, लक्ष्मण गुद्देवाडी, जाफर जमादार, चंद्रकांत कुंभार, विश्वनाथ गायकवाड, दिलीप बनसोडे, काशिनाथ धूळशेट्टी, धुळप्पा बजे, विठ्ठल बनसोडे, देवेंद्र गायकवाड, खाजप्पा गायकवाड, महादेव बनसोडे, सतीश बनसोडे, तुकाराम व्हदलुरे, विजयकुमार मुलगे, बाबू बजे, सिद्दप्पा पाटील, लक्ष्मण पाटील, नरसप्पा पटणे हे उपस्थित होते.

या स्पर्धेत रु. २१ हजार, रु.१५ हजार, रु.११ हजार, रु.७ हजार, रु.५ हजार तर शेवट कुस्ती सदलापुरची कन्या व महाराष्ट्र चॉम्पियन पै. धरती बनसोडे यांच्या कडून चांदीची गदा प्रधान करण्यात आली. या कुस्ती करिता वस्ताद म्हणून उप महाराष्ट्र केसरी पै.मौला शेख, पै.अण्णप्पा अचलेर,पै.महेश कुलकर्णी, पै.परमेश्वर शेळके, पै.हिरालाल सावंत, महाराष्ट्र चॉम्पियन पै.सुंदर जवळगे, पै.कमलाकर खरात यांनी काम पहिले. अक्कलकोट तालुक्यासह जिल्ह्यातील व धाराशिव जिल्ह्यातील पैलवानांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला.

# मल्लिकार्जुन भणगे यांचे कार्य आश्रमशाळे करिता अविस्मरणीय : भीमराव जाधव

**अक्कलकोट/प्रतिनिधी**



निःस्वार्थ भावनेने आश्रमशाळेस शिस्त लावून, आश्रम शाळा व संस्थेसाठी भरीव असे कार्य माजी मुख्याध्यापक मल्लिकार्जुन भणगे यांचे समर्पित कार्य संस्थेसाठी अविस्मरणीय असल्याची भावना कै. मल्लिकार्जुन पाटील संस्थेचे सचिव भारत जाधव यांनी व्यक्त केले.

कै. मल्लिकार्जुन पाटील प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा बोरोटी ता. अक्कलकोट येथील शिक्षक, मुख्याध्यापक मल्लिकार्जुन लकमन्ना भणगे हे आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्याने प्रित्यर्थ भव्य सत्कारसन्मान कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते त्यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी भीमाशंकर बैरूणगी, डॉ. प्रदीप धिवारे, रिपाई चे रत्नाकर गायकवाड, कमलाकर कांबळे,माजी मुख्याध्यापक सुपुत्र जाधव,शिवशरण,सिद्धप्पा भणगे, राजकुमार भणगे आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविक प्राजक्ता माने -भणगे यांनी केले यावेळी विठ्ठल कुंभार, अब्दुल जमादार, बनसोडे व बलवान गोतसुर्वे यांनी आपल्या मनोगतात सेवानिवृत्त मुख्याध्यापक भणगे सर यांच्या स्वभावाबद्दल माहिती सांगून स्तुती केली.यावेळी विलास माने, किरणकुमार सोनकांबळे,विनायक माने व बोरोटी आश्रम शाळेचे शिक्षक कर्मचारी यांची प्रमुख उपस्थिती होती.पुढे बोलताना जाधव यांनी इतर शाळेत काम करणे जसे सोपे वाटते तसे आश्रम शाळेत कार्य करणे म्हणजे एक कसोटी असते पण श्री मल्लिकार्जुन भणगे यांनी आपल्या कलांनी, परिश्रमाने मनाने झोपून देऊन कार्य केल्याने आश्रम शाळेचे भवितव्य घडू शकले आज त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्ताने शाळेला तर त्यांची उणीव भासेलच पण त्याने आता आपल्या कुटुंबाकडे जास्त लक्ष द्यावे असे सांगून त्यांना त्यांच्या जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे नियोजन प्रियांका भणगे- सोनकांबळे यांनी अतिशय नेटकेपणाने केले. यावेळी अक्कलकोट परिसरातील सर्व आजी-माजी शिक्षक, मित्र मंडळ व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांना शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन व आभार विठ्ठल कुंभार यांनी केले.

# सांगवी बु गावाजवळ झालेल्या अपघाता बद्दल महाराष्ट्र राज्य कृषी सहाय्यक संघटने कडून मा सहा.निवडणूक निर्णय अधिकारी सोलापूर यांना निवेदन

**शिरवळ/हणमंत घोदे**

अक्कलकोट वागदरी रोडवर सांगवी बु गावाजवळ सोमवार दि २७ मे रोजी संध्याकाळी वॅगनर कार व टू व्हीलर याच्या मध्ये भीषण अपघात झाले होते टू व्हिलर वरील अपघातग्रस्त हे शिरवळ येथील रोहित राजकुमार थोरात कृषी सहायक व शिरवळवाडी येथील सिद्धाराम लिंबण्णा शिरगांपुरे कृषी सहायक असे असून हे दोघे तालुका कृषि अधिकारी कार्यालय अक्कलकोट या कार्यालयाचे अधिनस्त असलेले श्री सिध्दाराम लिबण्णा शिरगापूरे कृषि सहाय्यक व श्री रोहीत राजकुमार थोरात कृषि सहाय्यक याची निवडणूक मतमोजणी सहाय्यक म्हणन नियुक्ती करण्यांत आलेले होती व ते दि २७/०५/२०२४ रोजी जिल्हा नियोजन भवन सोलापूर येथे उपस्थित राहून निवडणूक प्रशिक्षण पुर्ण करुन घरी दुचाकीवरुन परत येत असताना अक्कलकोट वागदरी रोड सांगवी बु गावाजवळ त्याच्या भीषण अपघात झाला होता या अपघातात दोघेही कृषी सहायक गंभीररीत्या जखमी झाले आहेत सध्या श्री सिध्दाराम शिरगापूरे यांचावर वळसंगकर न्यूरो हॉसपीटल सोलापूर येथे उपचार सुरु असून त्याच्या एक हात व एक पाय मोडलेले असून शरीरास अतिशय गंभीर सरपाचा मार लागलेला आहे. तसेच श्री रोहीत थोरात याच्या एक हात व एक पाय मोडलेले असून त्यांना डोक्यास जबर मार लागल्याने ते अध्यापपर्यंत शुध्दीवर आलेले नसून त्यांना चंदन न्युरो सायन्स हॉसपीटल येथे त्याच्यावर उपचार सुरु आहेत. दोन्ही कर्मचारी याची वैद्यकीय उपचार घेण्यासाठी कुटूंबाची आर्थिक परस्थिती कंमकुवत आहे. शासन निर्णय किंवा लागू असलेल्या शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग शा नि क्र सीइएल ड.छे २०१९/प्रक्रिया/४७०/१९/३३ दिनांक ११/०४/२०१९ संबंधितास वैदयकीय उपचारासाठी शासन स्थरावरुन आर्थिक सहाय उपलब्ध करुन घ्यावे म्हणून महाराष्ट्र राज्य कृषी सहायक संघटना कडून निवेदन देण्यात आले निवेदन देताना संघटनेचे पदाधिकारी व अक्कलकोट कृषी कार्यालय येथील कर्मचारी उपस्थित होते.

